**जिल्हा परिषद मधील अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांचे ओळखपत्र,नावाची पाटी व कामाचे स्वरुप याबाबी कामाचे ठिकाणी दर्शनी भागावर लावणे.**

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग
परिपत्रक क्रमांक - साप्रवि/रवका/९१/२०२५
दिनांक - ०३/०३/२०२५

वाचा -

१.महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडिल परिपत्रक क्र संकीर्ण २०१४/ प्रक्र १६/१८(रं.व.का.) दि.७ मे २०१४

२.महिला व बाल विकास विभागाकडिल शासन निर्णय क्र संकिर्ण २०२३ प्रक्र २५८/ कार्या २ दिनांक १४ मार्च २०२४

प्रस्तावना -

जिल्हयातील नागरीकांना त्यांच्या कामाच्या निमित्ताने जिल्हा परिषदेमधील निरनिराळया कार्यालयात येत असतात त्यांचे कामाशी संबधीत अधिकारी/कर्मचारी यांचे नाव व पदनाम माहित होण्यासाठी किंवा त्यांची भेट घेण्यासाठी संबधीत अधिकारी/कर्मचारी यांची ओळख पटणे आवश्यक आहे. शासकिय कार्यालयात हजर असलेले संबधीत अधिकारी/कर्मचारी यांनी दर्शनी भागावर ओळखपत्र लावणेबाबत सुचना दिलेल्या आहेत. परंतु असे निदर्शनास आले आहे कि, संबधीत अधिकारी/कर्मचारी यांचे बसण्याची जागा व त्यांचे कामाचे स्वरुप इत्यादी बाबी दर्शनी भागात न लावल्यामुळे नागरीकांना त्यांचे कामाचे संबधीत अडचणी निर्माण होत असलेचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे पुढील प्रमाणे सुचना निर्गमित करण्यात येत आहे.

परिपत्रक —

जिल्हा परिषदेमधील सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी खालील प्रमाणे तात्काळ कार्यवाही करावी

1. सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी कार्यालयात हजर असताना दर्शनी भागात ओळखपत्र लावावे.
2. सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांचे बसण्याचे जागी दर्शनी भागात त्यांचे नाव व पदनाम यांचे फलक लावावे. सदर फलक हा १५ x ४.५ इंच या आकाराचा आकाशी निळया रंगाच्या पांढ-या अक्षरामध्ये नाव असावे.ओळखपत्र व फलकावर नाव हे संदर्भ क्र २ चे शासन निर्देशानुसारच टाकावे.
3. सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांचे कडे सोपविण्यात आलेले कर्तव्य सुचीमध्ये अधिकारी कर्मचारी यांचे नाव,पदनाम,कार्यासनाचे नाव,कामाचे थोडक्यात स्वरुप याबाबीचा समावेश असलेले प्रारुप A4 साईजमध्ये टंकलिखत स्वरुपात करुन प्लॅस्टीक फोल्डर मध्ये ठेवुन दर्शनिभागात लावावे.सदर कर्तव्य सुचीवर कार्यालय प्रमुख यांची स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे.

सर्व खाते प्रमुख/कार्यालय प्रमुख यांनी आपले कार्यालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे निदर्शनास सदर बाब आणावी व उपरोक्त नुसार कार्यवाही होईल यांची दक्षता घ्यावी. सदर सुचनाची अंमलबजावणी करण्यास कुचराई करण्या-या संबधीत अधिकारी कर्मचारी यांच्या विरुध्द वरिष्ठ अधिका-यांनी योग्य ती कार्यवाही करावी. सदर परिपत्रक अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या https://nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असुन त्यांचा सकेतांक क्र. 202503030400032 असा आहे.

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 03-03-2025 18:51:07
( आशिष येरेकर. भाप्रसे )
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति

१.खाते प्रमुख (सर्व),जिल्हा परिषद अहिल्यानगर
२.गटविकास अधिकारी,पंचायत समिती (सर्व),जिल्हा अहिल्यानगर